संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवर सहायक रासायनिक विश्लेषक, गट-ब या पदावर सरळसेवेने नियुक्ती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन आदेश क्र. एफएसएल-०४१८/प्र.क्र.५१३/पोल-४,
मंत्रालय, मुंबई,
दिनांक :- ३० जुलै, २०१९

संदर्भ : १) कक्ष अधिकारी, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचे पत्र क्रमांक-११६७/२१९२/आठ, दिनांक ०५.११.२०१८,

२) महासंचालक (न्यायिक व तांत्रिक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र./No: महासंचालक/ गो/४८-४९/२०१९, दि. ०७.०६.२०१९,

३) गृह विभाग शासन निर्णय क्र. एम.आय.एस- १३१५/प्र.क्र-२३७/पोल-४, दिनांक- ३०.०५.२०१५,

४) सामान्य प्रशासन, शासन निर्णय क्रमांक: एसआरव्ही-२०१८/व्ही.आय.पी.६७/प्र.क्र.२०७/कार्या.१२, दि.२८ मे,२०१८.

प्रस्तावना :-

महासंचालक (न्यायिक व तांत्रिक), महाराष्ट्र राज्य यांच्या अधिनस्त संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवर सहायक रासायनिक विश्लेषक, गट-ब [६ व्या वेतन आयोगानुसार रु. ९३००-३४८०० + ग्रेड पे रु.४४००/-] व [सुधारीत मॅट्रीक्समधील वेतनस्तर S-१५ : ४१८००-१३२३०० या वेतनश्रेणीत ७ व्या वेतन आयोगानुसार] या वेतनश्रेणीतील पदे निर्माण करण्यात आली आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या उपरोक्त संदर्भाधिन दि.०५.११.२०१८ च्या पत्रान्वये एकूण ८२ उमेदवारांची त्यांच्या गुणवत्ताक्रमानुसार सहायक रासायनिक विश्लेषक, गट-ब या पदासाठी शासनास शिफारस करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे गुणवत्ता क्र.६५ येथील उमेदवाराचा अपंग प्रवर्गातील नियुक्तीबाबतचा प्रस्ताव सामाजिक न्याय विभागाच्या अभिप्रायाच्या अनुषंगाने नियुक्ती देण्याकरीता शासनस्तरावर विचाराधीन आहे. तसेच, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी मूळ अर्ज क्र. २१/२०१९ मध्ये दि. १३.०३.२०१९ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने गुणवत्ता यादीतील खुला-महिला या प्रवर्गातील शेवटच्या तीन उमेदवारांच्या नियुक्त्या मा. न्यायाधिकरणाच्या अंतिम आदेशाच्या अधिन राहून देणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने एकूण ८१ उमेदवाराचे साक्षांकन नमूना, वैद्यकीय तपासणी अहवाल आणि चारित्र्य व पूर्वआयुष्य पडताळणी अहवाल प्राप्त झाल्याने त्यांची न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयातील परिविक्षाधीन सहायक रासायनिक विश्लेषक, गट-ब या पदावर अटी व शर्तीनुसार सरळसेवेने स्थानापन्न नियुक्ती देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेश :-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शासनास शिफारस केलेल्या या शासन आदेशासोबतच्या **सहपत्र-अ** मधील नमूद एकूण ८१ उमेदवारांची त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी परिविक्षाधीन सहायक रासायनिक विश्लेषक, गट-ब [६ व्या वेतन आयोगानुसार रु. ९३००-३४८०० + ग्रेड पे रु.४४००/-] व

[सुधारीत मॅट्रीक्समधील वेतनस्तर S-१५ : ४१८००-१३२३०० या वेतनश्रेणीत ७व्या वेतन आयोगानुसार] या पदावर स्थानापन्न नियुक्ती खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार करण्यात येत आहे.

१) उपरोक्त संदर्भ क्र. ०४ मधील सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयातील सुचने- प्रमाणे संबंधित उमेदवारांनी सदर आदेश प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग, कलिना, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई- ४०० ०९८ येथे आवश्यक त्या सर्व मूळ कागदपत्रांसह हजर रहावे अन्यथा सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

२) मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी मुळ अर्ज क्र.२१/२०१९ मध्ये दि.१२.०३.२०१९ रोजीच्या आदेशान्वये गुणवत्ता यादीतील खुला-महिला प्रवर्गातील शेवटचे तीन उमेदवार, श्रीमती राजमती अशोक पाटील, खुला(महिला) (गुणवत्ता क्र. ७५), श्रीमती शितल बाबूराव मालकर, खुला (महिला) (गुणवत्ता क्र. ७६) व श्रीमती विद्या श्रीकांत निकम, खुला (गुणवत्ता क्र. ७७) या उमेदवारांची नियुक्ती मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांच्या अंतिम आदेशाच्याअधिन राहील.

३) सदर नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी उमेदवारांना प्रवास भत्ता अनुज्ञेय नाही.

४) सदरहू उमेदवारांना या आदेशान्वये नियुक्ती दिली असली तरी त्यांची सेवाज्येष्ठता ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने निश्चित केलेल्या गुणवत्ता क्रमांकानुसार राहील.

५) सदरहू उमेदवारांना शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक अंनियो १००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५ नुसार विहित केलेली परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू राहील.

६) सदर उमेदवारांचा परिविक्षाधीन कालावधी हा नियुक्तीच्या पदावर रुजू झाल्याच्या तारखेपासून २ वर्षाचा (प्रशिक्षण कालावधी धरून) राहील.

७) सदर पदासाठी विहित केलेले प्रशिक्षण त्यांना पूर्ण करणे बंधनकारक राहील.

८) उमेदवाराने परिविक्षाधीन कालावधीत विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

९) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९ मार्च, २००३ अन्वये संगणक हाताळणी/वापराबाबतचे शासन मान्यताप्राप्त मूळ प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत विभागप्रमुखाकडे सादर करणे आवश्यक आहे.

१०) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र.चापअ-१००८/प्र.क्र.२१४/०८/१६-अ, दिनांक ९ जानेवारी, २००९ नुसार उमेदवारांची चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवाल आणि महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती)- नियम १९८१ मधील नियम-१५ नुसार वैद्यकीय तपासणी अहवाल सादर करणे आवश्यक आहे. सदर उमेदवाराची वरील नमूद प्राप्त झालेले अहवालांची तपासणी/छाननी करण्याच्या अधीन राहून सदर नियुक्ती देण्यात येत आहे. सदर अहवाल असमाधानकारक असल्याचे निदर्शनास आल्यास सदर नियुक्ती कोणतेही कारण न देता १ महिन्याची नोटीस देवून समाप्त करण्यात येईल.

११) सदर उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र मूळ स्वरूपात ६ महिन्यांच्या कालावधीत अधिवास प्रमाणपत्र, उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र व लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र आणि शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे मूळ स्वरूपात तात्काळ सादर करणे बंधनकारक राहील.

१२) दोन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधी किंवा त्यानंतर शासनाने विहित नियमानुसार वाढविलेला परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतर त्यांची सहायक रासायनिक विश्लेषक, गट-ब या संवर्गात नियमित नेमणूक केली जाईल.

१३) परिविक्षा कालावधीमध्ये [६ व्या वेतन आयोगानुसार रु.९३००-३४८०० + ग्रेड पे रु.४४००/-] व [सुधारीत मॅट्रीक्समधील वेतनस्तर S-१५ : रू.४१८००-१३२३०० या वेतनश्रेणीत ७ व्या वेतन आयोगानुसार] या वेतनश्रेणीत वेतन मिळेल. परिविक्षाधीन कालावधीतील एक वर्ष पूर्ण झाल्यावर

पहिली वार्षिक वेतनवाढ देण्यात येईल व त्यानंतरची वेतनवाढ परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतर शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१३७०/डी, दिनांक १२.४.१९७२ अनुसार देण्यात येईल. त्यांना नियमाप्रमाणे महागाई भत्ता व इतर भत्ते अनुज्ञेय राहतील.

१४) जर दोन वर्षाच्या कालावधीच्या आत किंवा वाढविलेल्या परिविक्षाधीन कालावधीमध्ये कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त करू शकले नाहीत आणि / किंवा विहित परीक्षा/ चाचण्या उत्तीर्ण झाले नाहीत किंवा गैरवर्तणुकीबदद्ल दोषी आढळले किंवा शासकीय सेवेत अभियोग्य नसतील तर अशा उमेदवाराची सेवा सेमाप्त करण्यात येईल.

१५) नियमाप्रमाणे उमेदवारांना विहित मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागेल व सदर परिक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

१६) उपरोक्त वर नमूद केलेल्या अटी व शर्ती व्यतिरिक्त महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील गट-ब च्या अधिकाऱ्यांना लागू असलेले अन्य सेवाविषयक नियम त्यांना लागू होतील.

१७) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दि.०५.११.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सदर पदासाठी शासनास शिफारस केलेल्या गुणवत्ता क्र. ६५ येथील उमेदवार श्री. सुनील बाळासो पाटील, यांच्या नियुक्तीबाबत सामाजिक न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार शासनस्तरावर अंतिम निर्णय घेण्यात येईल व त्याबाबत वेगळयाने आदेश निर्गमित करण्यात येतील.

१८) उमेदवारांची पदस्थापना सदर शासन निर्णयात दर्शविण्यात आलेल्या ठिकाणीच करण्यात येईल, तसेच उमेदवारांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्र असलेले आधार कार्ड, मोटार ड्रायव्हींग लायसन्स अथवा अन्य वैध प्रमाणपत्रे यापैकी एकाच्या आधारे रूजू करून घेण्याबाबतची दक्षता संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी घ्यावी.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७३०१७५००२४७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

Somnath Vasant Potare

Digitally signed by Somnath Vasant Potare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4d677dcd1bc3bed55a48ddbdaad925a6651c5d43a12d84cf305d3ff791ea7f16, serialNumber=17e9c3c1ef20b007fefc5a1f1ec0e69f061648d4f897d5822e9f0e56899502e0, cn=Somnath Vasant Potare
Date: 2019.07.30 18:10:41 +05'30'

(सोमनाथ पोटरे)
अवर सचिव, गृह विभाग

प्रति,

१. महासंचालक (न्यायिक व तांत्रिक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य , मुंबई.
३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
४. मा. मंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री (गृह)/शहरे/ग्रामीण, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
६. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (सा.प्र.वि.१२/सा.प्र.वि.१६-ब) मंत्रालय, मुंबई
७. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
८. उपसंचालक, प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, नाशिक/पुणे / औरंगाबाद/नागपुर/अमरावती/कोल्हापूर/नांदेड

९. उपसंचालक, लघु न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, ठाणे/धुळे/रत्नागिरी/ सोलापूर/चंद्रपूर.

१०. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई

११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

१२. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक/पुणे / औरंगाबाद/ नागपुर/ अमरावती/ कोल्हापूर/ नांदेड/ठाणे/रत्नागिरी/धुळे/सोलापुर/चंद्रपूर

- **सर्व संबंधीत उमेदवार.**

  (सहपत्र-अ मधील अ.क्र. १ ते ८१ मधील यादीप्रमाणे संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, मुंबई यांचे मार्फतीने नोंदणीकृत डाकेने)

सहपत्र-अ

गृह विभाग, शासन आदेश क्र.एफएसएल-०४१८/प्र.क्र.५१३/पोल-४, दि.३०.०७.२०१९

अ. क्र.	म. लो. आ. गुण-वत्ता क्र.	उमेदवाराचे नाव	वर्गवारी	आयोगाने नियुक्तीसाठी शिफारस केलेला प्रवर्ग	विभागीय संवर्ग	नियुक्तीच्या न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेचे ठिकाण
१	१	श्री.चेतन बबन गुणगे	वि.मा.प्र.	खुला-१	नाशिक	नाशिक
२	२	श्रीम.स्वाती श्रीरंग माने	खुला (महिला)	खुला(महिला-१)	पुणे	पुणे
३	३	श्री.अभिषेक मोहनराव ताडे	इ.मा.व	खुला-२	अमरावती	अमरावती
४	४	श्री.शाम वेंकट बोंदर	भ.ज.(ड)	खुला-३	औरंगाबाद	नांदेड
५	५	श्री.संतोष अशोक रानडे	खुला	खुला-४	नाशिक	नाशिक
६	६	श्रीम.मनिषा गेनुलाल डोहडे	इ.मा.व.	इ.मा.व.(महिला-१)	नागपूर	नागपूर
७	७	श्री.मंगेश अरुणराव कुलकर्णी	खुला	खुला-५	औरंगाबाद	औरंगाबाद
८	८	श्रीम.किर्ती दिलीप बडवे	खुला (महिला)	खुला (महिला-२)	पुणे	पुणे
९	९	श्रीम. प्रज्ञा रघुनाथराव जोशी	खुला	खुला -६	नागपूर	नागपूर
१०	१०	श्री.किशोर सुरेश गवळे	अनु.जाती	अनु.जाती-१	नागपूर	नागपूर
११	११	श्री.गुणवंत राजकुमार देशमुख	खुला	खुला (७)	अमरावती	अमरावती
१२	१२	श्रीम.अश्विनी सुरेश सातपुते	अनु.जाती (महिला)	अनु.जाती (महिला-१)	कोकण-२	मुंबई
१३	१३	श्रीम.स्वाती भिमराव पाटील	खुला	खुला-८	कोकण- २	मुंबई
१४	१४	श्रीम.पुजा अशोक झांजे	खुला	खुला -९	कोकण- २	मुंबई
१५	१५	श्रीम.अपूर्वा दिलीप देवरे	इ. मा.व. (महिला)	खुला-१०	नाशिक	नाशिक
१६	१६	श्री.मारुती सोमनाथ घुगे	भ.ज. (ड)	खुला-११	नाशिक	नाशिक
१७	१७	श्री.केशव शामराव कापगते	इ. मा.व.	खुला-१२	नागपूर	नागपूर
१८	१८	श्रीम.अश्विनी अशोक यादव	खुला (महिला)	खुला (महिला)	नागपूर	नागपूर
१९	१९	श्री.योगेश कुवरलाल पटले	इ. मा.व.	खुला -१३	नागपूर	नागपूर
२०	२०	श्री.समीर आजमतुल्ला चौधरी	खुला	खुला -१४	औरंगाबाद	नांदेड
२१	२१	श्री.सुयोग अशोक सोनी	खुला	खुला -१५	नाशिक	नाशिक
२२	२२	श्रीम.अर्चना तानाजी सावंत	खुला	खुला -१६	कोकण-१	रत्नागिरी
२३	२३	श्री.संतोष बाबासाहेब बाबर	खुला	खुला -१७	नागपूर	नागपूर

२४	२४	श्रीम.नेहा विदयाधर सारवे	इ.मा.व. (महिला)	खुला -१८	नागपूर	नागपूर
२५	२५	श्रीम.तृप्ती नुरदेव चौधरी	इ. मा.व. (महिला)	इ.मा.व.(महिला-२)	अमरावती	अमरावती
२६	२६	श्री.लिलाधर मुरलीधर भंगाळे	खुला	खुला -१९	नाशिक	नाशिक
२७	२७	श्री.भुवनेश विजय तांडेल	वि.मा.प्र	खुला -२०	कोकण-२	मुंबई
२८	२८	श्रीम.श्वेता दिलीप पाटील	खुला	खुला -२१	औरंगाबाद	औरंगाबाद
२९	२९	श्री.महादेव लक्ष्मण कदम	खुला	खुला - २२	नागपूर	नागपूर
३०	३०	श्रीम.शारदा आसाराम ऊबाळे	खुला (महिला)	खुला (महिला-४)	अमरावती	अमरावती
३१	३१	श्रीम.पूनम सुरेश उमाळे	अनु.जाती (महिला)	अनु.जाती (महिला-२)	नाशिक	नाशिक
३२	३२	श्री.विक्रम अप्पासाहेब ढेरे	इ. मा.व.	खुला -२३	नाशिक	नाशिक
३३	३३	श्री.राहुल विलास चव्हाण	खुला	खुला -२४	औरंगाबाद	औरंगाबद
३४	३४	श्री.नितीन राजाभाऊ लव्हांडे	इ. मा.व.	खुला -२५	औरंगाबाद	नांदेड
३५	३५	श्री.मयुर आनंदराव राजेशिर्के	खुला	खुला (खेळाडू-१)	नाशिक	नाशिक
३६	३६	श्री.शशिकांत नारायण आहिरे	खुला	खुला (खेळाडू-२)	नाशिक	धुळे
३७	३७	श्री.विलास शिवाजी ठाणगे	खुला	खुला (खेळाडू-३)	नागपूर	नागपूर
३८	३८	श्री.रुपेश ज्ञानेश्वर पाटील	इ. मा.व.	इ. मा.व.-१	कोकण-२	मुंबई
३९	३९	श्री.महेश गुणाजी खेडकर	इ. मा.व.	इ. मा.व.-२	औरंगाबाद	नांदेड
४०	४०	श्री.आतिश बबनराव गजभिये	अनु.जाती	अनु.जाती -२	अमरावती	अमरावती
४१	४१	श्री.सचिन रमेश गोल्हे	इ. मा.व.	इ. मा.व.-३	अमरावती	अमरावती
४२	४२	श्री.आशिष हरीदास वाघमारे	अनु.जाती	अनु.जाती -३	नागपूर	नागपूर
४३	४३	श्री.भास्कर तुकाराम भोईर	अनु. जमाती	अनु. जमाती -१	औरंगाबाद	नांदेड
४४	४४	श्री.दिग्विजय दिनकर कांबळे	अनु.जाती	अनु.जाती-४	नागपूर	नागपूर
४५	४५	श्री.राहुल लोटन पाटील	इ. मा.व.	इ. मा.व.-४	अमरावती	अमरावती
४६	४६	श्रीम.सविता नारायण खोब्रागडे	इ.मा.व. (महिला)	इ.मा.व.(महिला -३)	नागपूर	नागपूर
४७	४७	श्री.जीवन भरत सदाकाळ	खुला (अपंग)	खुला (अपंग-१)	पुणे	पुणे
४८	४८	श्री.शशिकांत भास्कर गटकळ	इ. मा.व.	इ. मा.व.-५	औरंगाबाद	नांदेड
४९	४९	श्रीम.नेहा गेंदलाल नगराळे	अनु.जाती	अनु.जाती-४	नागपूर	चंद्रपूर
५०	५०	श्री.दिपक विष्णू कांबळे	अनु.जाती	अनु.जाती-५	नागपूर	नागपूर
५१	५१	श्री.दादासाहेब मारुती बनसोडे	भ.ज.(क)	भ.ज.(क)-(सर्वसाधारण -१)	अमरावती	अमरावती
५२	५२	श्री.भागवत रामदास पाटील	इ. मा.व.	इ. मा.व.-६	औरंगाबाद	नांदेड

५३	५३	श्री.उज्वला उदलसिंग नागलोत	विजा. (अ)	विजा.(अ)(महिला -१)	औरंगाबाद	औरंगाबाद
५४	५४	श्री.मनिष अरुण पाटील	इ. मा.व.	इ. मा.व.-७	नागपूर	नागपूर
५५	५५	श्री.चंद्रकांत मारुती हाडबे	भ.ज. (ड)	भ.ज. (ड) -१	अमरावती	अमरावती
५६	५६	श्री.हरिश्चंद्र दिगंबर जिरीमाळी	इ. मा.व.	इ. मा.व.-८	औरंगाबाद	नांदेड
५७	५७	श्री.अतुल प्रविण जाधव	अनु.जाती	अनु.जाती -६	नागपूर	नागपूर
५८	५८	श्रीम.कावेरी गंगाधर गोर्डे	इ. मा.व. (महिला)	इ.मा.व.(महिला-३)	अमरावती	अमरावती
५९	५९	श्रीम.भाग्यश्री लक्ष्मणराव पवार	विजा. (अ) (महिला)	विजा. (अ) (सर्वसाधारण-१)	औरंगाबाद	नांदेड
६०	६०	श्री.विजय बालाजीराव सुवर्णकार	इ. मा.व.	इ.मा.व.(खेळाडू-१)	औरंगाबाद	नांदेड
६१	६१	श्री.प्रविण निवृत्ती कांबळे	अनु.जाती	अनु.जाती-७	औरंगाबाद	नांदेड
६२	६२	श्रीम. वर्षा शिवाजी ठावरे	भ.ज. (क) (महिला)	भ.ज. (क) (महिला-१)	नागपूर	नागपूर
६३	६३	श्री.पंकज शिवाजी हुलवान	भ.ज.(क)	भ.ज.(क) (सर्वसाधारण-२)	अमरावती	अमरावती
६४	६४	श्रीम.स्नेहल हरिभाऊ कुताळ	खुला (महिला)	खुला (महिला-५)	औरंगाबाद	औरंगाबाद
६५	६६	श्रीम.छाया बाळासाहेब काळे	इ. मा.व. (महिला)	इ.मा.व.(महिला-४)	औरंगाबाद	औरंगाबाद
६६	६७	श्रीम.रुपाली सुधाकर सेलोकर	इ. मा.व. (महिला)	इ.मा.व.(महिला-५)	नागपूर	नागपूर
६७	६८	श्रीम.सुवर्णा राजाराम बोकले	खुला (महिला)	खुला (महिला-६)	नागपूर	नागपूर
६८	६९	श्रीम.स्वाती बाळासो पवार	खुला (महिला)	खुला (महिला-७)	अमरावती	अमरावती
६९	७०	श्री.प्रियंका नामदेव चव्हाण	खुला (महिला)	खुला (महिला-८)	औरंगाबाद	औरंगाबाद
७०	७१	श्रीम.नम्रता नरसिंह घोगरे	खुला (महिला)	खुला (महिला-९)	पुणे	पुणे
७१	७२	श्री.धनंजय उत्रेश्वर कोर्टे	वि.मा.प्र	वि.मा.प्र-१	अमरावती	अमरावती
७२	७३	श्रीम. रोशन रमेश जाधव	खुला (महिला)	खुला (महिला-१०)	औरंगाबाद	औरंगाबाद
७३	७४	श्रीम.जयश्री अमरसिंग तडवी	अनु. जमाती (महिला)	अनु. जमाती (महिला-१)	नागपूर	नागपूर
७४	७५	श्रीम.राजमती अशोक पाटील	खुला (महिला)	खुला (महिला-११)	अमरावती	अमरावती
७५	७६	श्रीम.शितल बाबुराव माळकर	खुला (महिला)	खुला (महिला-१२)	औरंगाबाद	औरंगाबाद
७६	७७	श्रीम.विदया श्रीकांत निकम	खुला (महिला)	खुला (महिला-१३)	पुणे	पुणे

७७	७८	श्रीम.स्नेहल सुदाम मांडवे	अनु. जमाती (महिला)	अनु. जमाती (सर्वसाधारण-२)	औरंगाबाद	औरंगाबाद
७८	७९	श्री.जालींदर मगर पिंपळे	अनु. जमाती	अनु. जमाती (सर्वसाधारण-३)	औरंगाबाद	औरंगाबाद
७९	८०	श्री.अश्विन रमेश गावीत	अनु. जमाती	अनु. जमाती- (सर्वसाधारण-४)	नागपूर	नागपूर
८०	८१	श्री.कैलास तुकाराम पिठे	अनु. जमाती	अनु. जमाती- (सर्वसाधारण-५)	औरंगाबाद	नांदेड
८१	८२	श्री.जितेंद्र सुदाम मराडे	अनु. जमाती	अनु. जमाती- (सर्वसाधारण-६)	नागपूर	नागपूर